"Education through Self-help is our motto"-KARMAVEER

RAYAT SHIKSHAN SANSTHA ,SATARA 1919-2019

100 Centenary

# RAYAT SHIKSHAN SANSTHA,SATARA

Maharashtra State (INDIA)

Founder : Padmabhushan Dr.Karmaveer Bhaurao Patil, D.Litt

Fax No : (02162) - 231424
STD No. (02162)
234566,233857,232444,
228566, 234857

Website : www.rayatshikshan.edu E-mail :secretary@rayatshikshan.edu

Ref.No. लेखी/१००८ट
Date: ५/०८/2019

प्रति,

प्राचार्य,

सर्व महाविद्यालये,

रयत शिक्षण संस्था

विषय – **अविष्कार संशोधन प्रकल्पाबाबत** (शैक्षणिक वर्ष २०१९-२०२०)

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते कि, रयत शिक्षण संस्थेमार्फत सर्व महाविद्यालयांमध्ये रयत अविष्कार संशोधन प्रकल्प सुरु आहे. त्याअनुषंगाने संस्थेचा सर्व महाविद्यालयातील विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी मध्यवर्ती अविष्कार संशोधन महोत्सवाचे आयोजन करण्यात येते. मध्यवर्ती अविष्कार संशोधन महोत्सव २०१९ चे ठिकाण व वेळ स्वतंत्र पत्राने कळविण्यात येईल.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयात अविष्कार संशोधन प्रकल्पांतर्गत पदवी, पदव्युत्तर व शिक्षक गटासाठी कार्यशाळा, Demo model तयार करणे, Working model तयार करणे व अंतर्गत स्पर्धा सप्टेंबरपूर्वी घेण्यात याव्यात. त्यातील उत्कृष्ट संघ निवडण्यात यावा व निवड झालेले विद्यार्थी मध्यवर्ती अविष्कार संशोधन महोत्सव २०१९ मध्ये सहभागी होतील. त्यासाठी सोबत जोडलेल्या नियम व अटींचा विचार करावा. संस्थास्तरावर सदर प्रकल्पासाठी प्रा.डॉ.डी.डी.नामदास, यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा यांची समन्वयक म्हणून नियुक्ती केलेली आहे. (मोबाईल-९८५०७५२१७७) अधिक माहितीसाठी प्रा.डॉ.डी.डी.नामदास यांच्याशी संपर्क साधावा.

तरी वरीलप्रमाणे आपल्या महाविद्यालयातून मध्यवर्ती अविष्कार संशोधन महोत्सव २०१९ मध्ये सहभागी होण्या-या विद्यार्थी व शिक्षक यांची स्पर्धेच्या सहा कॅटेगरीनुसार नावासह यादी या कार्यालयाकडे दि.३०/०९/२०१९ पर्यंत rayatsrproject@gmail.com या इमेलवर पाठवावी.

सचिव,

रयत शिक्षण संस्था, सातारा

Dr. Chandore
9/08/2019

सोबत – अविष्कार स्पर्धेसाठी नियम व अटी

प्रत माहितीसाठी

१) मा.सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा

२) प्राचार्य, डॉ. बी. टी. जाधव, दहिवडी कॉलेज, दहिवडी

३) प्रा.डॉ. व्ही.एम.कुंभार, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा

४) प्रा.डॉ.डी.डी.नामदास, यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा

Jitendra/SKJ/Paripatrak.doc p* 46

Inward No: 838
Date: 9/08/19

Scanned with CamScanner

"Education through Self-help is our motto"-KARMAVEER

RAYAT SHIKSHAN SANSTHA 1919-2019 Centenary

# RAYAT SHIKSHAN SANSTHA,SATARA

Maharashtra State (INDIA)

Founder : Padmabhushan Dr.Karmaveer Bhaurao Patil, D.Litt

Fax No : (02162) - 231424
STD No. (02162)
234566,233857,232444,
228566, 234857

Website : www.rayatshikshan.edu E-mail :secretary@rayatshikshan.edu

Ref.No. स्कील/10083
Date: 5/08/2019

प्रति,

प्राचार्य,

सर्व महाविद्यालये,

(विज्ञान विद्याशाखा असलेली)

रयत शिक्षण संस्था

विषय – **रयत इन्स्पायर प्रकल्प सुरु करणेबाबत. .**

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, रयत शिक्षण संस्थेमार्फत विज्ञान विद्याशाखा असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये रयत इन्स्पायर प्रकल्प सन २०१४-२०१५ पासून सुरु आहे. त्यानुसार या प्रकल्पाचे माध्यमातून विद्यार्थ्यांना संशोधनातील आवड निर्माण व्हावी, विद्यार्थ्यांना संशोधनासाठी व्यासपीठ मिळावे व नवीन संशोधनाची ओळख व्हावी या हेतूने हा प्रकल्प सुरु आहे.

तरी सदर प्रकल्पात बी.एस्सी.भाग १, २ व ३ मधील खालीलप्रमाणे विद्यार्थी समाविष्ट करावेत. विद्यार्थी व विद्यार्थिनी गुणानुक्रमे निवडाव्यात. या विद्यार्थ्यांसाठी विज्ञान कार्यशाळा घ्याव्यात व प्रकल्पांचे वाटप करावे तसेच व्याख्यानाचे कार्यक्रम राबवावेत. महाविद्यालयात जर DST ची इन्स्पायर स्कॉलरशिप मिळविणारे काही विद्यार्थी शिकत असल्यास त्यांचाही समावेश या प्रकल्पात करावा. सदर प्रकल्पासाठी संस्थेकडून काही प्रमाणात आर्थिक मदत करण्यात येते.

बी.एस्सी.भाग १ वर्गात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचेकडून Models (Working Model, Demo Model) तयार करून घ्यावीत व त्याचे प्रदर्शन महाविद्यालयात घेण्यात यावे. सदर प्रदर्शनातून चांगले १० विद्यार्थी निवडून त्यांना मध्यवर्ती रयत इन्स्पायर प्रकल्प प्रदर्शनासाठी तयार ठेवावे. संस्थेमार्फत आयोजित केल्या जाणा-या मध्यवर्ती रयत इन्स्पायर प्रकल्प प्रदर्शनाची ठिकाण व वेळ स्वतंत्र पत्राने कळविण्यात येईल.

बी.एस्सी.भाग २ मधील विविध विषयात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांमधून प्रत्येक विषयाचे ५ विद्यार्थी निवडावेत. सदर विद्यार्थ्यांना Project Based Learning (PBL) प्रकल्प देऊन सदर प्रकल्पाचे कामकाज डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी या तीन महिन्यामध्ये पूर्ण करावे. यामधून उत्कृष्ट ५ प्रकल्प निवडून ठेवावेत.

Dr. Chandore
9/08/2019

पान नं. २ वर . . .

Scanned with CamScanner

"Education through Self-help is our motto"-KARMAVEER
RAYAT SHIKSHAN SANSTHA,SATARA
Maharashtra State (INDIA)
Founder : Padmabhushan Dr.Karmaveer Bhaurao Patil, D.Litt
SHIKSHAN SANSTHA ,SATARA 1919-2019
100 Centenary

Fax No : (02162) - 231424
STD No. (02162)
234566,233857,232444,
228566, 234857
Website : www.rayatshikshan.edu E-mail :secretary@rayatshikshan.edu

Ref.No.
Date: / / 201



बी.एस्सी.भाग ३ मधील विद्यार्थ्यांना आपण प्रोजेक्ट (प्रकल्प) देत असतो. काही विद्यापीठात हा प्रकल्प सक्तीचा असतो. बी.एस्सी.भाग ३ मध्ये शिकणारे विद्यार्थी त्यांचा प्रकल्प परीक्षेपूर्वी पूर्ण करतात. त्यानुसार रयत इन्स्पायर प्रकल्पांतर्गत बी.एस्सी.भाग ३ चे विद्यार्थ्यांसाठी Project-Design-Development-Demonstration (PD3) Presentation, Publication, Production and Patent (P4) हा प्रकल्प राबवावा.

प्रा.डॉ.आर.बी.मोरे, यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा (मोबाईल- 9422404258) हे संस्थापातळीवरील सदर प्रकल्पाचे समन्वयक म्हणून काम करीत आहेत. अधिक माहितीसाठी प्रा.डॉ.आर.बी.मोरे यांचेशी संपर्क साधावा.

सचिव,
रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रत माहितीसाठी

१) मा.सहसचिव (उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा
२) प्राचार्य, डॉ. बी. टी. जाधव, दहिवडी कॉलेज, दहिवडी
३) प्रा.डॉ.व्ही.एम.कुंभार, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा
४) प्रा.डॉ.आर.बी.मोरे, यशवंतराव चव्हाण इन्स्टिटयूट ऑफ सायन्स, सातारा

Jitendra/Skill/Paripatrak.doc p* 48

Inward No: 832
9/08/18

Scanned with CamScanner